**CNR : MHST05-000225-2014**

**<u>विशेष दिवाणी मुकदमा क्र. २६/२०१४</u>**

रतन मेटल्स ..... **वादी**

**वि.**

यश एन्टरप्राइजेस .... **प्रतिवादी**

**<u>नि. ७८ वरील आदेश</u>**

१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादीने पुरावा बंदचा आदेश रद्द होणेकामी दाखल केला आहे.

२. प्रस्तुत अर्जास वादी यांनी म्हणणे देवून अर्जास तीव्र विरोध केला आहे.

३. दोन्ही बाजुंचा युक्तिवाद ऐकला. प्रतिवादीच्या वकिलांचे निवेदन असे की, वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये तडजोडीची बोलणी चाललेली होती. प्रतिवादीचे मुखत्यार यांनी या दाव्याबाबत पाठपुरावा व्यवस्थित केला नाही व त्याने प्रतिवादींनादेखील माहिती न देता काम सोडून निघून गेला. प्रतिवादी त्यांच्या मुलाच्या प्रकृती अस्वास्थ्यामुळे वकीलांकडे जाऊ शकले नाहीत. तडजोडीची बोलणी चालू असल्यामुळे न्यायालयात जाण्याची आवश्यकता नाही अशा समजुतीखाली ते राहीले. प्रतिवादींना पुरावा देण्याची संधी न मिळाल्यास प्रतिवादींचे नुकसान होणार आहे. त्यामुळे सदरचा पुरावा बंदचा आदेश रद्द करण्यात यावा. वादी यांचे वकिलांचे निवेदन असे की, वादीने त्यांचा पुरावा दि.०४/०८/२०१६ रोजी बंद केला आहे. तेव्हापासून प्रतिवादीने पुरावा देण्यासाठी काहीही तजवीज केलेली नाही. प्रतिवादींचा पुरावा दि.१२/०३/२०१९ रोजी बंद करण्यात आला. तेंव्हापासून प्रतिवादीने पुरावा देण्याचा प्रयत्न केला नाही. प्रस्तुत प्रकरणाचे काम लांबवण्यासाठी प्रतिवादीने हा अर्ज दिलेला आहे. प्रतिवादी यांनी अर्जामध्ये दिलेले कारण हे संयुक्तिक नाही. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज

खोटा व लबाडीचा असल्याने नामंजूर करण्यात यावा.

४. वादी व प्रतिवादी यांनी अर्ज म्हणणे व युक्तिवादातील केलेली कथने विचारात घेता तसेच प्रस्तुतचा दावा हा वादीने प्रतिवादीविरुध्द रक्कम वसूल होवून मिळणेसाठी केलेला असल्याने त्यासंबंधीचा पुरावा न्यायालयासमोर येणे गरजेचे आहे. प्रतिवादीला पुरावा देणेची संधी दिल्यास दाव्याचा गुणदोषावर निर्णय होण्यास मदत होणार आहे. तसेच वादीस प्रतिवादीचा उलटतपास घेण्याची संधी मिळणार असल्याने त्यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. परंतु प्रतिवादींनी केलेल्या ९ महिन्यांच्या विलंबाकरीता त्यांच्यावर खर्च बसविणे योग्य होणार आहे. म्हणून मी खालील आदेश देत आहे.

## आदेश

प्रतिवादी यांचेविरुद्ध दि. १२/०३/२०१९ रोजी पुरावा बंद केल्याचा आदेश रक्कम रु.१,०००/- खर्च वादीस देण्याच्या अटीवर रद्द केला आहे.

Digitally signed by Prasad Anant Savadikar
Date: 2019.11.20 17:23:38 +0530

कराड.
दि. २०/११/२०१९

(प्र. अ. सवदीकर)
सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, कराड